## जनसंपर्क विभाग

जळगाव दि.५ (प्रतिनिधी)भारतीय ज्ञान परंपरेचे ज्ञान आणि मूल्य प्रत्येक शतकात त्यावेळीच्या परिस्थिती अनुरूप मार्गदर्शनपर ठरली आहेत, आपण भारतीय ज्ञान परंपरेचा अभिमान बाळगायला हवा असे प्रतिपादन कला व मानव्यविद्याचे अधिष्ठाता प्रा. जगदीश पाटील यांनी केले.

कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ येथे सुरू असलेल्या भारतीय ज्ञान परंपरा आणि जागतिक प्रभाव या विषयावरील राष्ट्रीय परिषदेचा समारोप झाला. यावेळी मंचावर पीएमउषाचे समन्वयक प्रा.आशुतोष पाटील, कला व मानव्य विद्या प्रशाळेचे संचालक प्रा. राम भावसार, परिषदेचे सचिव डॉ. तुषार रायसिंग आणि परिषदेचे समन्वयक डॉ.विणा महाजन हे उपस्थित होते. प्रा.आशुतोष पाटील मनोगत व्यक्त करताना म्हणाले की, विद्यार्थ्यांमध्ये रुची वाढविण्यासाठी आयकेएसचा वापर करून घेता येईल असे सांगितले. संचालक प्रा. राम भावसार यांनी दोन दिवसीय राष्ट्रीय परिषदेचा आढावा घेतला. केतन वाघ यांनी प्रतिनिधिक स्वरूपात मनोगत व्यक्त केले.सूत्रसंचालन दीपाली माळी आणि इशिका गुप्ता यांनी तर आभार डॉ. तुषार रायसिंग यांनी मानले.

या राष्ट्रीय परिषदेच्या दुसऱ्या दिवसाच्या प्रथम सत्रात संस्कृत अकॅडमी, हैदराबादचे संचालक डॉ. मधुसुदन पेन्ना यांनी ऑनलाईन भारतीय तत्वज्ञानाची आंतरराष्ट्रीय प्रासंगिकता या विषयावर परिषदेला मार्गदर्शन केले. त्यांनी सांगितले की, भारतीय ज्ञान परंपरेत प्राचीनकाळी भाषेचा खोलवर अभ्यास भारतीय तत्त्वज्ञानांनी केलेला आढळतो जो कोणत्याही इतर देशात झालेला दिसत नाही आजही अनेक देशात भारतीय तत्त्वज्ञान अभ्यासले जाते.

द्वितीय सत्रात जगदंब महाविद्यालय अचलपूर, वाणिज्य शास्त्राचे प्रा. मयुरेश शिंगरूप यांनी भारतीय ज्ञान प्रणालीचा आढावा आणि जागतिक संदर्भात कौटिल्य अर्थशास्त्राची प्रासंगिकता या विषयावर मार्गदर्शन केले त्यांनी त्यावेळी सांगितले की, प्राचीन ग्रंथसंपदेवर भारतीय ज्ञान परंपरा उभी आहे त्यामुळेच आपल्याला आपली संस्कृतीची माहिती मिळते,असे सांगितले. यावेळी सहभागींनी शोधनिबंधांचे सादरीकरण केले.

**बातमी नं. २**

जळगाव (प्रतिनिधी) दि. ५ : कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठातील संगणक शास्त्र प्रशाळेच्यावतीने दिनांक २८ फेब्रुवारी २०२६ रोजी ' प्री- कॉन्फरन्स वर्कशॉप' मध्ये सहभागी विद्यार्थी संशोधक आणि मान्यवर यांच्यासाठी 'प्रमाणपत्र वितरण सोहळा', आयोजित करण्यात आला होता. या कार्यक्रमास विज्ञान आणि तंत्रज्ञान विद्याशाखेचे अधिष्ठाता प्राचार्य डॉ. एस. एस. राजपूत व वाणिज्य व व्यवस्थापन विद्याशाखेचे अधिष्ठाता प्रा. अनिल डोंगरे यांची प्रमुख उपस्थिती होती.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संगणक शास्त्र प्रशाळेचे संचालक प्रा. राकेश रामटेके हे होते. यावेळी संगणक शास्त्र प्रशाळेच्या विद्यार्थ्यांसाठी सन १९९७-२००० बॅचच्या माजी विद्यार्थ्यांनी त्यांच्या मित्राच्या स्मरणार्थ स्थापित 'प्रवीण देशमुख चॅरिटेबल ट्रस्ट या संस्थेच्या वतीने ' प्रोग्रामर ऑफ द फ्युचर स्कॉलरशिप', ची घोषणा करण्यात आली. या स्कॉलरशिप अंतर्गत प्रशाळेत **एम.सी.ए., एम.एस्सी. कॉम्प्युटर सायन्स आणि एम. एस्सी. डेटा सायन्स**, या अभ्यासक्रमातील अंतिम वर्षात शिक्षण घेणाऱ्या प्रत्येक अभ्यासक्रमातील एका विद्यार्थ्याच्या शैक्षणिक शुल्काच्या (ट्युशन फीस) स्वरूपात ही स्कॉलरशिप देण्यात येणार आहे. यासाठी तज्ञ समितीकडून पात्र विद्यार्थ्यांची निवड चाचणी व निवड प्रक्रियेद्वारे निवड केली जाणार आहे, अशी माहिती प्रा. अजय सुरवाडे यांनी दिली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. एस एस भामरे यांनी केले तर प्रा. कापसे यांनी आभार प्रदर्शन केले.या कार्यक्रमास प्रशाळेतील शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थ्यांची उपस्थिती होती.

---

जा.क्र.:-कबचौउमवि/१६/ई-मेल/बातमी/२०२६ दिनांक: ५ मार्च, २०२६

प्रति,

मा.संपादक/प्रतिनिधी,

कृपया, उपरोक्त बातमीस आपल्या लोकप्रिय दैनिकातून प्रसिध्द करावी, ही विनंती.

आपला विश्वासू

जनसंपर्क अधिकारी करीता